0001

# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-**

१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक २०/०३/२०१३ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१८/२०१३/जा.२५७, दिनांक २२/०३/२०१३ व २६/०३/२०१३.

३) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे तथा अनुज्ञप्ती प्राधिकारी यांचे दिनांक २६/०३/२०१३ रोजी प्राप्त अहवाल.

४) वरीष्ठ पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक ३०/०३/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

५) वरीष्ठ पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक १६/०४/२०१३ रोजीचे अभिवेदन.

६) मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. यांचे वतीने ॲड. श्री. पांडुरंग अे. पोळ यांचे दि. १६/०४/२०१३ रोजीचे लेखी निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१८/२०१३/जा. ४४९
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इंशुरस इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक १७/०५/२०१३.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

## आ दे श

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक ०८/०३/२०१३ रोजी श्री इंटरप्राईसेस, प्लॉट नं. ए/३५, ३६, एमआयडीसी, टीसीसी एरीया महापे, नवी मुंबई - ४००७०९ येथे मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. या व्यापाऱ्यांनी विनापरवाना कडधान्य, तेलबिया व अन्नधान्याची साठवणूक केल्याची पक्की खबर या कार्यालयास मिळाल्याने या कार्यालयाच्या अधिपत्त्याखालील शिधावाटप कार्यालय क्रमांक ४१/फ, वाशी येथील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह सायंकाळी सुमारे ०५.४० वाजता उपरोक्त आस्थापनेची तपासणी करण्यासाठी सदर आस्थापनेत प्रवेश केला. आस्थापनेच्या कार्यालयात उपस्थित व्यक्तिस अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष स्वत:ची, सहकार्यांची व पंचांची ओळख करुन देवून त्यास त्याचे नाव

0002

पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव दत्ता विरकर असे सांगून उपरोक्त आस्थापनेत जनरल मॅनेजर म्हणून काम करीत असल्याचे सांगितले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी त्यांना सदर ठिकाणी कोणत्या कडधान्य, तेलबिया व अन्नधान्याची साठवणूक केली आहे व ते कोणाच्या मालकीची आहेत अशी विचारणा केली असता? सदर गोदामात मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. या निर्यातदार कंपनीचे करडी, ब्राऊन सिसम सिड, ब्लॅक सिसम सिड व तांदळाचा साठा साठवणूक करुन ठेवल्याचे सांगितले. सदरचा साठा हा नमूद निर्यातदार कंपनी स्थानिक बाजारपेठेतून खरेदी करुन तो निर्यात करण्यापूर्वी सदर गोदामात साठवणूक करीत असल्याचे सांगितले. सदर गोदामात विविध व्यापाऱ्यांना त्यांचे अन्नधान्य व कडधान्य गोदामात साठवणूक करुन ठेवण्याची सेवा उपलब्ध करुन देतो व त्याप्रमाणे भाडे आकारतो. सदर आस्थापनेचे मालक श्रीमती राजश्री सर्वगोड या आहेत. आता त्या येथे उपस्थित नाहीत. त्या माहिम येथे आहेत, असे सांगितले. सदर आस्थापनेच्या मालकांस भ्रमणध्वनी करुन बोलावून घेण्याबाबत मॅनेजर दत्ता यांना सांगितले असता त्यांनी श्रीमती राजश्री सर्वगोड, मालक यांना भ्रमणध्वनीवरुन संपर्क साधून घटनास्थळी येणेबाबत सांगितले तेंव्हा श्रीमती राजश्री सर्वगोड यांनी घटनास्थळी येत आहेत, असे सांगितले.

तदनंतर अधिकाऱ्यांनी सदर गोदामाच्या आवाराची पंचांसमक्ष पाहणी केली असता, सदर आवारात ५ मोठे गोदाम व १ शेड गोदाम असल्याचे आढळून आले. प्रत्येक गोदामाची क्षमता अंदाजे १५०० टन असून गोदामात साठवणूक करण्यात आलेल्या करडी, ब्राऊन सिसम सिड, ब्लॅक सिसम सिड व तांदळाचा साठयाची पंचांसमक्ष मोजदाद केली. सदर अन्नधान्य, तेलबिया साठवणूक करण्यासाठीचा विहीत परवाना घेतला आहे किंवा कसे ? याबाबत उपस्थित इसमास विचारणा केली असता, याबाबत अधिक माहिती गोदाम मालक देऊ शकतील असे सांगितले. दरम्यानच्या काळात श्रीमती राजश्री सर्वगोड, मालक या घटनास्थळी हजर झाल्या. अधिकाऱ्यांनी त्यांचेकडे गोदामातील साठवणूक केलेला साठा व त्यांचे साठा मालक याबाबत अधिक विचारणा केली असता, त्यांनी सदरचा साठा मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. या कंपनीचा असून, सदर साठयाच्या साठवणूकीसाठी प्रति बाचकी मासिक रु. २.२५/- ते रु. ५/- या प्रमाणे प्रतिमाह दर आकारला जात असल्याचे सांगून, सदरचा व्यवसाय मागील ३ वर्षापासून करीत असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी सदर साठयाबाबत अधिक विचारणा केली असता, सदर अन्नधान्य व खाद्यतेलबियांचा साठा हा नमूद कंपनी स्थानिक बाजारपेठेतून खरेदी करुन, तो निर्यात करण्यापूर्वी त्यांच्या गोदामात साठवणूक करीत असल्याचे सांगितले. सदर साठयाचे खरेदी बिले त्यांनी उपलब्ध नसल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. या कंपनीकडे सदर साठयाच्या खरेदी, साठवणूक व विक्री करीता आवश्यक असणारा महाराष्ट्र अनुसूचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये घाऊक परवाना सादर करणेबाबत गोदामाचे मालक यांना सूचित केले असता, सदर कंपनीचे नावे असे कोणतेही परवाने त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे सांगितले. त्यामुळे अधिकाऱ्यांना सदरचा साठवणूक केलेला अन्नधान्य व खाद्यतेलबियांचा साठा हा विनापरवाना खरेदी व अवैध साठवणूक केल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न झाले. त्यामुळे

CONTROLLER OF RATIONING

खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. यांचा अन्नधान्य व खाद्यतेलबियांचा साठा जप्त करण्यात आला व सदर साठा पोलिसांचे ताब्यात देण्यात आला. तांदूळ , करडी व तिळ या तिन्ही धान्याचे प्रत्येकी ४ असे नियमानुसार पंचांसमक्ष नमुने घेऊन सिलबंद करण्यात आले.

| अ. क्र. | गोदाम क्रमांक | मुद्देमालाचा तपशिल | प्रत्येक बाचक्याचे वजन किलो | साठा/ नग बाचकी संख्या | वजन किलो | वजन क्विंटल | बाजारभावा प्रमाणे दर प्रति क्विंटल | बाजारभावा प्रमाणे अंदाजे किंमत रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | तांदूळ | २५ | १६० | ४००० | ४० | २२०० | ८८,०००/- |
| २ | १ | तांदूळ | ५० | २६० | १३००० | १३० | २२०० | २,८६,०००/- |
| ३ | १ | तांदूळ | ५० | १९० | ९५०० | ९५ | २२०० | २,०९,०००/- |
| ४ | १ | तांदूळ | ५० | ८१ | ४०५० | ४०.५ | २२०० | ८९,१००/- |
| ५ | २ | करडी | ५० | १२० | ६००० | ६० | ३५०० | २,१०,०००/- |
| ६ | २ | करडी | ५० | ८६ | ४३०० | ४३ | ३५०० | १,५०,५००/- |
| ७ | २ | काळे तिळ | ५० | ६४४ | ३२२०० | ३२२ | १२००० | ३८,६४,०००/- |
| ८ | २ | काळे तिळ | ५० | १४३ | ७१५० | ७१.५ | १२००० | ८,५८,०००/- |
| ९ | २ | काळे तिळ | ५० | १५०० | ७५००० | ७५० | १२००० | ९०,००,०००/- |
| १० | ४ | काळे तिळ | ७५ | ३० | २२५० | २२.५ | १२००० | २,७०,०००/- |
| ११ | ४ | करडी | ५० | ८८ | ४४०० | ४४ | ३५०० | १,५४,०००/- |
| | एकूण | | | ३३०२ | १६१८५० | १६१८.५ | | १,५१,७८,६००/- |

अशाप्रकारे मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. चे मालक १) जयंतकुमार भूरा २) अक्षय भूरा यांनी सदर साठयाच्या खरेदी, साठवणूक व विक्री करीता आवश्यक असणारा महाराष्ट्र अनुसूचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वयें घाऊक परवाना न घेता सदर धान्याचा व्यापार विनापरवाना व अवैधपणे करत असल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेंच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याने, संबंधिताविरुध्द जीवनाश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० व महाराष्ट्र अनुसूचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ च्या तरतूदींचा भंग केल्याने त्यांचेविरुध्द तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०२२/२०१३, दिनांक ०१/०३/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त ज़प्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी वाचावे क्र. १ अन्वये केलेली असून जप्त असलेला उपरोक्त मुद्देमाल शासनजमा का करण्यात येवू नये ? याबाबत वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली असून त्याकरीता या कार्यालयात दिनांक २६/०३/२०१३ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक २६/०३/२०१३ रोजीच्या सुनावणीस मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. चे चिफ एक्झेकटीव्ह अतुल मोरे यांनी प्राधिकारपत्रासह उपस्थित राहून त्यांचे कंपनीच्या वतीने ॲड. श्री. पी.ए. पोळ यांचा वकालतनामा सादर करुन त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली. मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि.चे वतीने उपस्थित अतुल मोरे यांनी तपासणी संबंधीचे कागदपत्रांची मागणी केली असता, सदरचे सर्व मुळ कागदपत्रे संबंधित पोलिस ठाणे येथे सादर केले असल्याने ते पोलिस ठाणे येथून प्राप्त करुन घेणे बाबत संबंधितांना सुचित करण्यात आले आहे. सदर सुनावणीस मे. श्री इंटरप्राईसेसचे मालक श्रीमती राजश्री सर्वगौड यांनी उपस्थित राहून सुनावणीच्या वेळी सदरचा साठा मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. यांचे वतीने त्यांच्या अपरोक्ष ठेवले असून सदर तपासणीनंतर संबंधित कंपनीच्या संचालक यांना दुरध्वनीवरुन संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतू ते मुंबई बाहेर असल्याचे वारंवार सांगितले जात आहे, असे सांगितले. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी हे उपस्थित राहिले नाहीत. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक १६/०४/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १६/०४/२०१३ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरीक्षक श्री. मालोजी शिंदे यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ५ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. सदर सुनावणीस मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. यांचे कंपनीच्या वतीने ॲड. श्री. पी.ए. पोळ यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ६ अन्वये लेखी निवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. चे संचालक अभिषेक भूरा, मे. श्री इंटरप्राईसेसचे मालक श्रीमती राजश्री सर्वगौड व मे. श्री इंटरप्राईसेसचे जनरल मॅनेजर दत्ता विरकर हे उपस्थित राहिले.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

## युक्तिवाद :-

उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे, यांचे दिनांक २६/०३/२०१३ रोजी प्राप्त अहवालात, मे. कल्पवृक्ष इंपेक्स प्रा.लि. या कंपनीने घाऊक/मिलर्स/ऑईल मिलचा परवाना मिळण्याकरीता त्यांच्या कार्यालयात अर्ज सादर केलेला नाही, असे नमूद केले आहे.

वरीष्ठ पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक ३०/०३/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, प्रस्तूत गुन्ह्यातील आरोपीत यांनी सदर साठ्याच्या खरेदी, साठवणूक व विक्री करीता आवश्यक असणारा महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये घाऊक परवाना न घेता सदर धान्याचा व्यापार विनापरवाना व अवैधपणे करीत आहेत. त्यांनी जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९, १० व महाराष्ट्र अनुसुचित वस्तू व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ च्या तरतुदींचा भंग केला आहे. नमूद

गुन्ह्याचा तपास चालू असून जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलमातील तरतुदीनुसार नमूद गुन्ह्यातील जप्त मुद्देमालाची विल्हेवाटबाबत आपलेकडून योग्य ते आदेश होणेस विनंती आहे, असे नमूद केले आहे.

दिनांक १६/०४/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरीक्षक श्री. मालोजी शिंदे यांनी सादर केलेल्या अभिवेदनात, मे. कल्पवृक्ष इंम्पेक्सचे संचालक श्री. जयंतकुमार भुरा व अभिषेक भुरा यांनी गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल हा श्री इंटरप्राईझेस, प्लॉट नं. ए/३५, ३६, एमआयडीसी, टीटीसी एरीया, महापे, नवी मुंबई येथे साठा केल्याबाबतचे कोणतेही कागदपत्रे अद्याप पर्यंत सादर केलेले नाहीत. तरी सदर गुन्ह्याचा तपास सुरु असून प्रस्तूत गुन्ह्यातील जप्त मुद्देमालाची विल्हेवाटीबाबत आपलेकडून योग्य ते आदेश होणेस विनंती आहे, असे नमूद केले आहे.

दिनांक १६/०४/२०१३ रोजीच्या सुनावणीस मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. यांचे कंपनीच्या वतीने उपस्थित ॲड. श्री. पी.ए. पोळ यांनी युक्तीवाद केला की, कारणे दाखवा नोटीसमध्ये त्यांच्या अशिलाने अन्नधान्य व खाद्यतेल बियांचा साठा खरेदी करुन त्यांची अवैध साठवणुक केल्याने जप्त केल्याचा पंचनामा केला आहे. तसेच त्याकरीता त्यांच्या अशिलाकडे कोणताही परवाना नसल्याने त्यांच्या अशिलाविरुध्द जीवनावश्यक वस्तु कायदा तसेच १९९८ च्या आदेशामधील तरतुदींचा भंग केल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कलम ६-अ (१) अन्वये तसेच त्या अनुषंगाने कलम ३ अन्वये अंमलात असलेल्या आदेशानुसार जीवनावश्यक वस्तुंचा साठा जप्त करण्यास परवानगी आहे. कारणे दाखवा नोटीसमध्ये त्यांच्या अशिलाने अन्नधान्य व खाद्यतेल बियांचा साठा खरेदी करुन त्याची अवैध साठवणुक केल्याने जप्त केल्याचे नमुद आहे. परंतु त्यांचे अशिल हे शासन मान्यताप्राप्त निर्यातदार असुन त्यांची तिसरी पिढी निर्यातीचा व्यवसाय करीत आहे. त्यांच्या अशिलाने यापूर्वीच साठयाची खरेदीबिले, एच फॉर्म, ट्रान्स्पोर्ट कॉपी, एक्पोर्ट सेल्स कॉन्ट्रॅक्ट, एक्सपोर्ट ऑर्डर, इ. च्या छायांकित प्रती सादर केल्या आहेत. सदर कागदपत्रांचे अवलोकन केल्यास जप्त करण्यात आलेला साठा हा विहीत मुदतीमध्ये निर्यात करावयाचा असल्याचे व तसे न केल्यास आयात देशातील खरेदीदारांकडून दंड आकारले जाईल. त्यामुळे त्याचा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत विपरीत परिणाम होईल. या बाबी विचारात घेता त्यांच्या अशिलाचा शासन अथवा उपभोक्त्यांची फसवणुक करण्याचे कोणतेही उद्देश नसल्याचे दिसुन येईल. फॉरेन ट्रेड पॉलिसीनुसार निर्यात व्यवसायामध्ये वृध्दी झाल्यास त्याचा देशास फायदा होणार आहे. सन २०११-२०१२ मध्ये खाद्यतेल बियांच्या सुमारे १३ लाख टन निर्यात करण्यास परवानगी असुन साठा जप्त झाल्यास नमुद उद्दीष्ट साध्य होणार नाही व त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत नामुष्की पत्करावी लागेल. त्यांच्या अशिलाविरुध्द कोणत्याही इसमाची शासन अथवा उपभोक्त्यांची फसवणुक केल्याबाबतची तक्रार नाही. शिधावाटप अधिकारी यांनी गुन्हा दाखल करतांना फसवणुक केल्याचे गृहीत धरुन जीवनावश्यक वस्तु कायदा तसेच १९९८ अन्वये आदेशाचा तरतुदींचा भंग केला म्हणुन कारवाई करण्यात आली आहे. सद्यस्थितीत त्यांच्या अशिलाने जीवनावश्यक वस्तु कायद्याच्या कलम ३,७,८,९ व १० तसेच १९९८ या आदेशाच्या तरतुदींचा भंग करुन

शासन अथवा उपभोक्त्यांची फसवणुक केल्याबाबतची कोणतेही पुरावादर्शक कागदपत्रे उपलब्ध नसल्याने सदरचे आरोप हे बिनबुडाचे असल्याचे दिसुन येते. त्यामुळे कारणे दाखवा नोटीस परत घेण्यात यावी. १९९८ या आदेशामधील कलम १० अन्वये नमुद केलेल्या साठामर्यादेच्या अनुषंगाने त्यांच्या अशिलाचा तांदळाचा साठा हा विहीत कमाल मर्यादेच्या आत असल्याने त्यांनी कोणतेही आदेशाचे उल्लंघन करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. सॅफफ्लॉवर व सिसम सिड हे दोन्ही वस्तु १९९८ या आदेशामधील कलम २(x) मध्ये अंतर्भुत नसल्याने १९९८ या आदेशानुसार परवाना घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. कारणे दाखवा नोटीस मधील मुद्दे हे मोघम स्वरुपाचे व ठोस नसल्याने ते मागे घेण्यात यावेत. त्यांच्या अशिलाने शिधावाटप परवाना मिळण्यासाठी ठाणे शिधावाटप कार्यालय येथे दिनांक १३/०१/२०१० रोजी अर्ज केला आहे. तद्‌नंतरच्या कालावधीत आजमितीस संबंधित प्राधिकरणाकडून अर्जामधील त्रुटी अथवा अर्ज नामंजुर केल्याबाबत कळविलेले नाही. सदरचा साठा हा समुंद्रामार्गे जेएनपीटी येथील बंदरामार्फत निर्यात करावयाचा असल्याने व्यावसायीकदृष्टया नवी मुंबई येथे साठवणुक व वाहतुक करण्यास सोईस्कर असल्याने नमुद ठिकाणी साठवणुक करण्यात आली आहे. सदर बाब विचारात घेता जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ अंतर्गत त्यांच्या अशिलाने उत्पादन, पुरवठा व वितरणाच्या प्रक्रियेमध्ये कोणताही अडथळा निर्माण केलेला नाही व त्या अनुषंगाने कारणे दाखवा नोटीसमध्ये ठोस पुरावा उपलब्ध नाही. जीवनावश्यक वस्तु कायदा चे कलम ६-अ अन्वये आदेश पारीत करण्यापूर्वी त्यामध्ये तांत्रिक चुका असल्याची बाब, बाजारपेठेत वितरणास बाधा झाल्याची बाब, साठेबाजी करण्याचा उद्देश या सर्व बाबींमध्ये त्यांच्या अशिलाचा कोणताही सहभाग नाही. त्यामुळे त्यांच्या अशिलाचा नफेखोरीचा कोणताही उद्देश नाही. सदरचा साठा व गोदाम हा अवैध पध्दतीने जप्त केला असल्याने त्यांच्या अशिलास व्यवसाय करणे अशक्य झाले असुन काम नसल्याने त्यांचा कामगार वर्गही बसुन आहे. त्यांच्या अशिलाकडे निर्यातीबाबतचे अनेक ऑर्डर प्रलंबित आहेत. सदर अवैध जप्तीमुळे त्यांच्या अशिलाचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरचा साठा हा निर्यात क रण्यास परवानगी दिल्यास साठा निर्यात केल्यानंतरचे पुरावादर्शक कागदपत्रे आपल्या कार्यालयास सादर करण्यात येईल. उपरोक्त बाबी विचारात घेऊन बजावण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस ही परत घेण्यात यावी व साठा मुक्त करुन अशिलास देण्यात यावा असे नमुद केले आहे.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, पोलिसांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक ०८/०३/२०१३ रोजी श्री इंटरप्राईसेस, प्लॉट नं. ए/३५, ३६, एमआयडीसी, टीसीसी एरीया महापे, नवी मुंबई - ४००७०९ येथे मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. या व्यापाऱ्यांनी विनापरवाना

कडधान्य, तेलबिया व अन्नधान्याची साठवणूक केल्याची पक्की खबर या कार्यालयास मिळाल्याने या कार्यालयाच्या अधिपत्याखालील शिधावाटप कार्यालय क्रमांक ४१/फ, वाशी येथील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह उपरोक्त आस्थापेनेची तपासणी केली. तपासणीत मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. चे मालक १) जयंतकुमार भूरा २) अक्षय भूरा यांनी सदर साठयाच्या खरेदी, साठवणूक व विक्री करीता आवश्यक असणारा महाराष्ट्र अनुसूचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये घाऊक परवाना न घेता सदर धान्याचा व्यापार विनापरवाना व अवैधपणे करत असल्याने, संबंधिताविरुध्द तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०२२/२०१३, दिनांक ०९/०३/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन तांदूळ, करडी, काळे तिळ यांचा रुपये १,५१,७८,६००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२३२० (ई), दिनांक २७/०९/२०१२ अन्वये डाळी/कडधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१३ पर्यंत व अधिसुचना क्र. एस.ओ.२९६८ (ई), दिनांक २०/१२/२०१२ अन्वये तांदुळ या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/११/२०१३ पर्यंत निर्बंध आहेत.

सदर प्रकरणी, उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे तथा अनुज्ञप्ती प्राधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालात, मे. कल्पवृक्ष इंपेक्स प्रा.लि. या कंपनीने घाऊक/मिलर्स/ऑईल मिलचा परवाना मिळण्याकरीता त्यांच्या कार्यालयात अर्ज सादर केलेला नाही, असे नमूद केले आहे.

तसेच वरीष्ठ पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचेकडून प्राप्त अभिवेदनात, प्रस्तूत गुन्ह्यातील आरोपीत यांनी सदर साठ्याच्या खरेदी, साठवणूक व विक्री करीता आवश्यक असणारा महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये घाऊक परवाना न घेता सदर धान्याचा व्यापार विनापरवाना व अवैधपणे करीत असल्याने त्यांनी जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९, १० व महाराष्ट्र अनुसुचित वस्तू व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ च्या तरतुदींचा भंग केला असल्याचे नमुद आहे.

मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. या कंपनीच्या वतीने ॲड. श्री. पी.ए. पोळ यांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, कारणे दाखवा नोटीसमध्ये त्यांच्या अशिलाने अन्नधान्य व खाद्यतेल बियांचा साठा खरेदी करुन त्याची अवैध साठवणुक केल्याने जप्त केल्याचा पंचनामा केला आहे. तसेच त्याकरीता त्यांच्या अशिलाकडे कोणताही परवाना नसल्याने त्यांच्या अशिलाविरुध्द जीवनावश्यक वस्तु कायदा तसेच १९९८ च्या आदेशामधील तरतुदींचा भंग केल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारणे दाखवा नोटीसमध्ये त्यांच्या अशिलाने अन्नधान्य व खाद्यतेल बियांचा साठा खरेदी करुन त्याची अवैध साठवणुक केल्याने जप्त केल्याचे सांगितले आहे. परंतु त्यांचे अशिल हे शासन मान्यताप्राप्त निर्यातदार असुन त्यांच्या अशिलाने यापूर्वीच साठयाची खरेदीबिले, एच फॉर्म, ट्रान्स्पोर्ट कॉपी, एक्पोर्ट सेल्स कॉन्ट्रॅक्ट, एक्सपोर्ट ऑर्डर, इ. च्या छायांकित प्रती सादर केल्या आहेत. तसेच १९९८ या आदेशामधील कलम १० अन्वये नमुद केलेल्या साठामर्यादेच्या अनुषंगाने त्यांच्या अशिलाचा तांदळाचा साठा हा विहीत कमाल

मर्यादेच्या आत असल्याने त्यांनी कोणतेही आदेशाचे उल्लंघन करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. सॅफफ्लॉवर व सिसम सिड हे दोन्ही वस्तु १९९८ या आदेशामधील कलम २(x) मध्ये अंतर्भुत नसल्याने १९९८ या आदेशानुसार परवाना घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही. कारणे दाखवा नोटीस मधील मुद्दे हे मोघम स्वरुपाचे व ठोस नसल्याने ती मागे घेण्यात यावी असे सांगितले.

महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ चे कलम २(z)(i) अन्वये "Wholesale Dealer means- In relations to foodgrains a person who carries of business of purchase, sale or storage for sale any one or more varieties of foodgrains in quantities of 50 quintals or more in aggrecate at any one time, to other dealers or other persons for sale and includes a commission dealer or sub wholesaler who holds stock of foodgrains for such sales in the conduct of his business " असे नमूद आहे.

कलम २(z)(vi) अन्वये "In relations to any edible oilseeds or edible oil a person who, whether for commission, remuneration or otherwise carries on the business of purchase, sale or storage for sale edible oilseeds or edible oils in quantities exceeding twentry quintals at any one time to other dealers or other persons at wholesale rates and includes a commission agent or a sub-wholesalers, who holds stocks of edible oilseeds or edible oils in the conduct of his business " असे नमूद आहे.

कलम ३(b) अन्वये - No person shall carry on business as a wholesale dealer in any one or more of the scheduled commodities except in accordance with the terms and conditions of all licence under this order : provided further that in relation to foodgrains, commission agents to act only on behalf of wholesalers or producers on commission but do not actually hold any stocks in the conduct of business shall not be required to take out a licence असे नमुद आहे.

कलम २(x) अन्वये नमुद अनुसुचित वस्तुंच्या यादीमधील अनुक्रमांक ४ मध्ये खाद्यतेलबियांची यादी विषद केली आहे. सदर यादीमधील अनुक्रमांक (ii) अन्वये Sunflower or Kardi तसेच अनुक्रमांक (iii) अन्वये Sesamum or Til असल्याचे स्पष्ट नमुद आहे.

उपरोक्त नमुद आदेशाचे अवलोकन करता, मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. या कंपनीने घटनास्थळी असलेल्या गोदामात तांदुळ या अन्नधान्याचा तसेच करडी व काळे तीळ या खाद्यतेल बियांचा साठा हा मोठया प्रमाणात साठवणुक केला असल्याने नमुद कंपनीस वरील नमुद आदेशाच्या कलम २(z)(i) अन्वये अन्नधान्यासाठी तसेच कलम २(z)(vi) अन्वये खाद्यतेलबियांसाठी घाऊक परवाना धारण करणे बंधनकारक आहे. तसेच कलम ३(b) अन्वये नमुद बाबींचे अवलोकन करता, केवळ कमीशन एजन्ट जे घाऊक व्यापारी अथवा उत्पादक यांच्यावतीने व्यवसायात सहभागी असल्यास परंतु ते कोणताही साठा संपादन करुन साठवणुक करीत नसल्यास त्यांना नमुद आदेशामधील तरतुदींच्या अनुषंगाने घाऊक परवाना घेण्यापासुन सुट देण्यात आल्याचे नमुद आहे. तसेच कलम

२(x) अन्वये करडी व तिळ या खाद्यतेलबियांचा साठा अनुसुचित वस्तुंच्या यादीमध्ये समाविष्ट असल्याची बाब प्रकर्षाने नमुद करावीशी वाटते. सदर प्रकरणी मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. या कंपनीने स्थानिक बाजारपेठेतुन अन्नधान्य व खाद्यतेलबियांचा मोठया प्रमाणात साठा खरेदी करुन तो साठा निर्यातीच्या माध्यमातुन विक्री करावयाचा असला तरीही त्यांनी नमुद गोदामात साठवणुक केला असल्याने त्यांना महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ या आदेशान्वये अन्नधान्य व खाद्यतेलबियांच्या खरेदी, साठवणुक व विक्री करीता घाऊक परवाना धारण करणे आवश्यक आहे.

मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. या कंपनीच्या वतीने केलेल्या खुलाशात, यांच्या अशिलाविरुध्द कोणत्याही इसमाची शासन अथवा उपभोक्त्यांची फसवणुक केल्याबाबतची तक्रार नाही. शिधावाटप अधिकारी यांनी गुन्हा दाखल करतांना फसवणुक केल्याचे निष्कर्षाप्रत येवून जीवनावश्यक वस्तु कायदा तसेच १९९८ अन्वये आदेशाचा तरतुदींचा भंग केला म्हणुन कारवाई करण्यात आली आहे. सद्यस्थितीत त्यांच्या अशिलाने जीवनावश्यक वस्तु कायद्याच्या कलम ३,७,८,९ व १० तसेच १९९८ या आदेशाच्या तरतुदींचा भंग करुन शासन अथवा उपभोक्त्यांची फसवणुक केल्याबाबतची कोणतेही पुरावादर्शक कागदपत्रे उपलब्ध नसल्याने सदरचे आरोप हे बिनबुडाचे असल्याचे दिसुन येत असल्याचे सांगितले.

उपरोक्त विवेचन लक्षात घेता मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. या कंपनीच्यावतीने केलेल्या खुलाशात, वास्तविकपहाता नोटीसांमधील नमुद मुद्यांच्या अनुषंगाने तसेच त्यांनी विनापरवाना अनुसुचित वस्तुंच्या साठयाची मोठया प्रमाणात खरेदी, साठवणुक व विक्री करीत असल्याची आढळून आलेली बाब ही प्रकर्षाने, घटनास्थळी करण्यात आलेल्या पंचनाम्यांत तसेच नोटीसीतही नमुद असतांना त्यांनी महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ या आदेशाचे तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ मधील तरतुदींचे उल्लंघन केल्याची पारदर्शक बाब न स्विकारता त्यांनी केवळ शासनाच्यावतीने करण्यात आलेल्या कारवाईवर ताशेरे ओढुन या कार्यालयाची पर्यायाने शासनाची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसुन येते.

मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. या कंपनीच्या वतीने केलेल्या खुलाशात, सदरचा साठा हा समुद्रामार्गे जेएनपीटी येथील बंदरामार्फत निर्यात करावयाचा असल्याने व्यावसायीकदृष्टया नवी मुंबई येथे साठवणुक व वाहतुक करण्यास सोईस्कर असल्याने नमुद ठिकाणी साठवणुक करण्यात आली आहे. सदर बाब विचारात घेता जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ अंतर्गत त्यांच्या अशिलाने उत्पादन, पुरवठा व वितरणाच्या प्रक्रियेमध्ये कोणताही अडथळा निर्माण केलेला नाही व त्या अनुषंगाने कारणे दाखवा नोटीसमध्ये ठोस पुरावा उपलब्ध नाही. तसेच त्यांच्या अशिलाने शिधावाटप परवाना मिळण्यासाठी ठाणे शिधावाटप कार्यालय येथे दिनांक १३/०१/२०१० रोजी अर्ज केला आहे. तद्नंतरच्या कालावधीत आजमितीस संबंधित प्राधिकरणाकडून अर्जामधील त्रुटी अथवा अर्ज नामंजुर केल्याबाबत कळविलेले नाही असे सांगितले.



DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... FICE

0010 शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक ९ मे, २००८ अन्वये शासनाने लागु केलेल्या साठामर्यादेच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाही संदर्भातील मार्गदर्शक सुचनांमध्ये केंद्रशासनाने डाळी, तांदुळ, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठयावर निर्बंध आणलेले आहेत त्यामुळे या वस्तुंचा व्यापार करण्यासाठी घाऊक अथवा किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे. डाळी, तांदुळ, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठामर्यादेबाबत लागु केलेले निर्बंध हे हंया वस्तु आयात केल्यास त्यावर लागु राहणार नाहीत. तसेच आयात वस्तुंचा व्यापार करण्यासही प्रतीबंध राहणार नाही. मात्र त्या व्यापाऱ्यांना मासीक विवरणपत्र भरण्यास सांगण्यात यावे असे नमुद आहे. तसेच शासन परिपत्रक क्र. ईसीए-१०१०/४९५/प्र.क्र.९४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २०१० अन्वये केंद्र शासनाने तांदुळ, धान, डाळी, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठामर्यादेवर निर्बंध लागु केले आहेत. सबब, या वस्तुंचा व्यापार व साठवणुक करण्याकरीता संबंधित अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याकडून परवाना घेणे आवश्यक आहे. या वस्तुंच्या आयातदारांना साठामर्यादेतुन सुट देण्यात आलेली आहे. परंतु खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या निर्यातदारांना परवाना घेणे आवश्यक आहे. म्हणजेच डाळी/कडधान्य तसेच अन्नधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तुंचा व्यापार करणारे घाऊक व्यापारी व निर्यातदार यांना सदर अनुसुचित वस्तुंच्या खरेदी, साठवणूक व विक्री करीता महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश १९९८ अन्वये घाऊक परवाना घेण्याची आवश्यकता आहे.

मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. या कंपनीचे संचालक यांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, साठा खरेदी केल्याबाबतची खरेदीबिले व इतर पुरावादर्शक कागदपत्रे सोबत जोडण्यात आली असून नमुद गोदामात तांदुळ व खाद्यतेलबियांचा साठा हा निर्यात करण्याकरीता साठवणुक केल्याचे सांगुन सदरचा साठा हा मुक्त केल्यास तो निर्यात करुन त्यासंबंधीचे कागदपत्रे सादर करण्यात येतील तसेच सदरचा साठा हा तात्काळ निर्यात करावयाचा असल्याचे सांगुन तो मुक्त करण्यात यावा व बजावण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस ही परत घेण्यात यावी, असे सांगितले.

प्रस्तुत प्रकरणी, मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. या कंपनीने श्री एन्टरप्रायझेस, नवी मुंबई या वेअरहाऊसमध्ये अनुसुचित वस्तुंचा साठा खरेदी करुन तो निर्यात प्रक्रियेद्वारे विक्री करण्याकरीता साठवणुक केला असल्यानें सदर व्यवसायाकरिता त्यांना महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश १९९८ चे कलम २ अन्वये अन्नधान्य व खाद्यतेलबिया करीता घाऊक परवाना घेणे आवश्यक आहे. मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. या कंपनीचा नमुद वेअरहाऊसमध्ये तांदुळ व खाद्यतेलबियांचा साठा जप्त असुन, त्याअनुषंगाने नमुद कंपनीच्यावतीने निवेदनासोबत सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता त्यांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचे कार्यालयात दिनांक २८/०१/२०१० रोजी केवळ खाद्येतलबियाच्या व्यवसायाकरीता नविन घाऊक परवानासाठी अर्ज केल्याची छायांकित प्रत सादर केली. सदर अर्जाच्या छायांकित प्रतीसोबत त्यांनी विहीत नमुन्यातील अर्जाची

तसेच त्यासोबत जोडण्यात आलेल्या कागदपत्रांची छायांकित प्रत सादर केलेली नाही. त्यामुळे सदर अर्जानुसार त्यांनी परवानासाठी कोणत्या पत्यावर अथवा कोणत्या वेअरहाऊसवर अर्ज केला आहे याचा बोध होत नाही. तसेच या व्यतिरीक्त त्यांनी तांदुळ या अनुसुचित वस्तुच्या घाऊक परवानासाठी अर्ज केल्याचे दिसुन येत नाही. अर्जदाराने नविन परवानासाठी अर्ज सादर करतांना अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करणे बंधनकारक आहे. परंतु नमुद कंपनीच्यावतीने अर्ज सादर करतांना आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केली नसल्याने अथवा तद्नंतरच्या कालावधीतही कागदपत्रांची पुर्तता करण्याची तसदी त्यांनी घेतली नसल्याचे दिसुन येते.

तथापी, शासन परिपत्रक क्र. ईसीए-१०१०/४९५/प्र.क्र.९४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २०१० अन्वये अर्जदाराने अर्ज करतांना तपासणीसुची प्रमाणे सर्व कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक असुन तसे न केल्यास अर्जदाराने या कागदपत्रांची ३० दिवसात पुर्तता करणे आवश्यक असल्याचे नमुद असुन त्यानंतर देखील अर्जदाराने कागदपत्रांची पूर्तता न केल्यास सदर अर्ज निकाली काढावा अर्थात कागदपत्रांची पुर्तता करणेस दिलेले ३० दिवस ही अंतीम तारीख असेल असे स्पष्ट नमुद केले आहे. मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. या कंपनीचे संचालक यांनी सदरचा आवश्यक असलेला घाऊक परवाना प्राप्त न केल्याचे सुनावणीच्यावेळी कबुल केले आहे. तसेच तपासी पोलिस अधिकारी यांच्या तपासातही निष्पन्न झाले आहे. यावरुन त्यांनी घाऊक परवाना मिळण्याकरीता अर्ज करुन फक्त सोपस्कार पुर्ण केल्याचे दिसुन येत असुन त्यांना सदरचा परवाना प्राप्त करुन घेण्याकरीता स्वारस्य नसल्याचे स्पष्ट होत आहे. सबब, मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. या कंपनीने नमुद वेअरहाऊसवर साठवणुक केलेला तांदुळ या अन्नधान्याचा तसेच करडी व तिळ या खाद्यतेलबियांच्या साठयाची अवैध खरेदी व साठवणुक करुन त्यांचा सुरु असलेला व्यवसाय हा पुर्णपणे बेकायदेशीर व विनापरवाना असल्याचे सिध्द होत आहे. सबब, मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. या कंपनीचा घटनास्थळी जप्त करण्यात आलेला तांदुळ या अन्नधान्याचा तसेच करडी व काळे तिळ या खाद्यतेलबियांचा विनापरवाना असलेला संपुर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०२२/२०१३, दिनांक ०९/०३/२०१३ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

<u>आदेश</u> :-

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला संपूर्ण तांदुळ, करडी व काळे तिळ यांचा साठा शासनजमा करण्यात यावा.

0012

२) सदर शासनजमा करण्यात आलेला संपूर्ण तांदुळ, करडी व काळे तिळ यांचा साठा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे (दुरध्वनी क्र. ०२२-२५३३२६५७) यांचे मदतीने वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. चे संचालक जयंतकुमार भूरा
२) मे. कल्पवृक्ष इंम्पेक्स प्रा. लि. चे संचालक अक्षय भूरा
३) मे. श्री इंटरप्राईसेसचे मालक श्रीमती राजश्री सर्वगौड
४) मे. श्री इंटरप्राईसेसचे जनरल मॅनेजर दत्ता विरकर
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.
५) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.